नमुना प्रश्नपत्रिका

# कुमारभारती - मराठी (प्रथमभाषा)

इ. १० वी

गुण - ८०

---

**प्र.१ अ. खालील प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय शोधून लिहा.** ०३

१) लोकमान्य टिळक यांचा गीतेवर भाष्य करणारा ग्रंथ कोणता आहे ?
(गीताई / ज्ञानेश्वरी / गीतारहस्य / ओरायन)

२) बुद्धीप्रमाणेच मनुष्याच्या अंत:करणाला कशाची आवश्यकता आहे ?
(शिक्षणाची/मार्गदर्शनाची/संस्कारांची/प्रोत्साहनाची)

३) 'विषय गेले पळून' या एकांकिकेतील इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र हे विषय पळून कोठे येतात ?
(एकाकी बेट/नो मॅन्स लँड/दक्षिण ध्रुव/गजबजलेले शहर)

**आ. योग्य पर्याय शोधून गाळलेल्या जागा भरा.** ०२

१) भाषा वाढावयास ................ सर्व व्यवहार त्याच भाषेत झाले पाहिजे.
(विद्यापीठातील/राष्ट्रातील/घरातील/देशातील)

२) 'पाठ फिरवणारा पाऊस' हा पाठ ................ या साहित्य प्रकारातील आहे.
(कथा/नाट्य/प्रवासवर्णन/ललित निबंध)

**प्र.२ अ. खालीलप्रैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** ०४

१) ''माझ्या प्रिय मित्रा ! असं धावणं फार वाईट''

२) त्या निर्णयाचा मला कधीच पश्चाताप झाला नाही.

**आ. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** ०६

१) 'मीच तुमचा बाजीराव' या पाठाच्या शीर्षकाची समर्पकता पाठाच्या आधारे स्पष्ट करा.

२) दादासाहेब फाळके यांनी चित्रपटनिर्मितीसाठी कशाकशाचा त्याग केला ?

३) प्र. ई. सोनकांबळे यांनी आपल्या पहिल्या चपलेविषयी कोणत्या आठवणी सांगितल्या आहेत ?

४) जिद्दीने घेतलेल्या शिक्षणाचा कोणता लाभ लेखिका इंदुमती जोंधळे व तिच्या भावंडांना झाला ?

५) केसकर सरांच्या तासाला चिमण्यांनी कसा त्रास दिला ?

**इ. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर ७० ते ८० शब्दांत लिहा.** ०५

१) 'हत्तीचा दृष्टान्त' या दृष्टान्त पाठातील सूत्र कथेच्या आधारे स्पष्ट करा.

२) 'स्त्रीपुरुष तुलना' या पाठात ताराबाई शिंदे स्त्रियांशी कसे वागायला सांगतात ?

३) लेखकाने केलेले बहुरूप्याच्या अभिनयाचे नाट्यमय वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.३ अ. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** ०३

१) संत तुकाराम यांच्या मते वडील मुलासाठी संपत्तीची प्राप्ती कशी करतात ?

२) भ्रमराला कशाची ओढ असते ?

३) 'नेमके निवडून घ्या ज्ञान' ही कविता लहू कानडे यांच्या कोणत्या कविता संग्रहातून घेतली आहे ?

**आ. योग्य पर्याय शोधून गाळलेल्या जागा भरा.** ०२

१) नाजूक इवल्या चोचीतून अन् ............... धून उठे.
(दरबारीची / आसावरीची / मल्हाराची / केदाराची)

२) ................ होऊनि थोर-लहानां समदृष्टीने पूजा
(अ-गम्य / अ-मूल्य / अ-कपट / अनिवार्य)

**इ. खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** ०४

१) न जावें तेथे जाये । न पाहावे तें जो पाहें ॥
न खावें तें खाये । तेवींचि तोषें ॥

२) देखणे ते स्कंध ज्यां ये सूळ नेता स्वेच्छया ।
लाभला आदेश प्राणां निश्चये पाळावया ॥

**ई. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** ०६

१) संत एकनाथ यांच्या मते मानवी मनातील षड्रिपूंचा नाश केव्हा होईल ?

**ई. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** ०६

१) संत एकनाथ यांच्या मते मानवी मनातील षड्रिपूंचा नाश केव्हा होईल ?

२) सत्पुरुषाच्या अंगी कोणते गुण असावेत असे वामन पंडित यांना वाटते ?

३) 'दूरस्थ मातेस' या कवितेतील मुलाची लोचने का ओलावली आहेत ?

४) 'वारस' या कवितेतील शेतकऱ्याच्या मनास कोणती तळमळ लागली आहे ?

५) खिडकीतून दिसणाऱ्या दृश्यातून कवी रफीक सूरज यांच्या मनात कोणते विचार निर्माण झाले ?

**प्र.४ अ. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ७० शब्दांत लिहा.** ०८

१) 'वृक्षराजीने वेढलेली मनाली' या पाठातून स्थलवर्णनाची कोणकोणती वैशिष्ट्ये स्पष्ट होतात ?

२) सुलभा ब्रह्मनाळकर यांच्या मते सत्याचा निकष कोणता ? कां ?

३) नागरिकशास्त्राच्या ज्ञानाचा उपयोग निरंजनने प्रत्यक्षात कसा केला ?

४) कवितेतील मुलाला रविवारी कोणकोणती कामे करावी लागतात ?

***किंवा***

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**

१) कशावरून खरं ?  २) खरा नागरिक

**प्र.५ अ. खालीलपैकी कोणत्याही एका अलंकाराची लक्षणे सांगून उदाहरण द्या.** ०२

१) अपह्नुति  २) व्यतिरेक

**किंवा**

**खालील उदाहरणातील अलंकार ओळखून त्याची लक्षणे सांगा.**

उदाहरण - चाफा बोलेना, चाफा चालेना

चाफा खंत करी, काही केल्या फुलेना ।।

**आ. खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समासांची नावे लिहा.** ०२

१) प्रियमूर्ती २) आजन्म ३) पंचारती ४) अज्ञानांधकार

**इ. खाली दिलेल्या शब्दगटांपैकी कोणत्याही दोन शब्दगटांतील अचूक शब्द ओळखून लिहा.** ०२

१) वसूंधरा / वसुंधरा / वसुधरा / वसूधंरा

२) निरवाह / निर्वाह / र्निवाह / नीरवाह

**ई. खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** ०१

मी पाळेन सृष्टिचे शास्त्र जे रूजले आहे मूळासारखे खोलवर

**उ. खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** ०१

रम्य ते बालपण म्हटले जाते पण माझे बालपण काही रमणीय नाही.

**ऊ. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)** ०२

१) आळा घालणे २) जमीन-अस्मानाचा फरक असणे.

३) तरबेज असणे ४) पाईक होणे

**किंवा**

**कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा त्याखाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा. (फक्त २)**

(पाणी सोडणे, चूर होणे, सलगी करणे, राबराब राबणे)

१) वर्गात नवीन आलेल्या विद्यार्थ्याची थोड्याच दिवसात इतर मुलांशी मैत्री झाली.

२) काळ्या मातीत कष्ट करून शेतकरी मनोमन सुखावतो.

३) अनेक समाजसुधारकांनी समाजसेवेसाठी सर्व सुखांचा त्याग केला.

४) मीना रांगोळी काढण्यामध्ये अगदी मग्न झाली होती.

**प्र.६ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा.** १०

१) तुमच्या शाळेमध्ये 'विद्यार्थी दिन' साजरा झाला. त्या दिवशी तुम्ही 'मराठी विषय शिक्षकाची' भूमिका केली. त्या पूर्ण दिवसाचा तुमचा अनुभव निबंधरूपात लिहा.

२) बदलते पर्यावरण

३) १०वी तील विद्यार्थ्याचे मनोगत

४) क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे.